# पुणे विद्यापीठ

## शैक्षणिक प्रवेश विभाग

### विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाची सूचना

### एस.सी./एन.टी./एस.बी.सी./ओ.बी.सी. स्कॉलरशीप व फ्रिशीप नवीन व नुतनीकरण असणाऱ्या सर्व प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी महात्वाचे

सन २०११–२०१२ मध्ये मा. विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांच्या आदेशानुसार एस.सी./एन.टी./एस.बी.सी./ओ.बी.सी. या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना ऑनलाईन पध्दतीने स्कॉलरशीप व फ्रिशीप अर्ज भरावयाचे आहेत. अर्ज फक्त ऑनलाईन पध्दतीनेच स्विकारले जाणार आहेत. अर्ज भरण्याची अंतिम तारीख **दि. १५/११/२०११** आहे.

**प्रवेशाच्या वेळी किंवा त्यानंतर ज्या विद्यार्थ्यांनी अर्ज भरले आहेत किंवा अद्यापपर्यंत ज्या विद्यार्थ्यांनी स्कॉलरशीप व फ्रिशीप अर्ज भरलेले नाहीत अशा सर्व विद्यार्थ्यांनी देखील ऑनलाईन अर्ज भरणे आवश्यक आहे, याची विद्यार्थ्यांनी गांभीर्याने दखल घ्यावी. जे विद्यार्थी ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरणार नाहीत त्यांनी स्कॉलरशीप व फ्रिशीप शासनाकडून मिळणार नाही. त्यामुळे होणाऱ्या आर्थिक नुकसानीस विद्यापीठ जबाबदार राहणार नाही याची नोंद घ्यावी.** विद्यार्थ्यांनी खालील वेबसाईटवरून अर्ज भरावेत.

http://mahaeschol.maharashtra.gov.in/Escholarshipstudent

वेबसाईटवरील अर्ज पूर्ण भरून त्याची एक प्रिंट काढून आवश्यक त्या कागदपत्रांसाहित आपल्या विभागात अर्ज जमा करावेत. विभागने प्रत्येक प्रवर्गातील विद्यार्थ्यांची माहिती शिष्यवृत्ती/फ्रिशीप याप्रमाणे वेगवेगळी भरून Excel Format मध्ये करून सीडी व हार्ड कॉपीसह शैक्षणिक प्रवेश विभागाकडे पाठवावी. कोणत्याही विद्यार्थ्याला आवेदनपत्रे घेण्यासाठी, भरून परत देण्यासाठी या कार्यालयात पाठवू नये.

ऑनलाईन पध्दतीने प्रत्यक्ष अर्ज करताना विद्यार्थ्यांनी खालील कागदपत्रे सामोर ठेवावीत.

१. प्रथम विद्यार्थ्यांनी User ID तयार करून Log In करणे
२. इयत्ता १० वी पासूनच्या सर्व मार्कलिस्ट (पदव्युत्तर मधील सर्व विद्यार्थ्यांनी इयत्ता १० वी मधील परीक्षा क्रमांक व आसन क्रमांक टाकणे बंधनकारक आहे)
३. विद्यार्थ्यांच्या नावाचा राष्ट्रीयकृत बॅंकेचा खाते क्रमांक, एमआयसीआर कोड, आयएफएस कोड
४. जातीचा दाखला
५. शाळा सोडल्याचा दाखला
६. तहशिलदाराचा उत्पन्नाचा दाखला

गणेशखिंड, पुणे – ७ }
संदर्भ : पीजीएस/ 1216 }
दिनांक : 12/११/२०११ }

12/11/11

उपकुलसचिव
(शैक्षणिक प्रवेश विभाग)